


साप्ताहिक


# दिनमान

तत्वांचा सन्मान... मातीशी ईमान

संपादक : समीर मुजावर RNI NO. MAHMAR/2007/22212 कार्यकारी संपादक : सौ. नाजनीन मुजावर

वर्ष ११ वे : अंक ३ रा सोमवार ११ जून २०१८ पृष्ठे १६ : मूल्य ५ रुपये email : dinmaan@gmail.com (वार्षिक वर्गणी : रू २००/- सर्व विशेष अंकासह)







Handcrafted jewellery comes at a price. But when it is fondly passed on through generations, it becomes priceless.

Ethnix, handcrafted designer jewellery from Malabar Gold & Diamonds is a timeless collection that relives a bygone era when every piece of jewellery with intricate detailing were signature masterpieces.

VENUS CORNER, STATION ROAD, **KOLHAPUR. TEL: 0231 2665916, 2666916**

Buy-back guarantee | One year free insurance
Lifetime free maintenance

**BUY ONLINE AT:** malabargoldanddiamonds.com
214 SHOWROOMS ACROSS 9 COUNTRIES






रमजान मुबारक... ईद मुबारक...

## श्री. शानूर मुजावर (राज सरकार)

● महाहिट २४ मराठी प्रा. लि. - मॅनेजिंग डायरेक्टर (M.D.) ● प्रदेशाध्यक्ष - प्रांत ग्राहक संरक्षण परिषद समिती, महाराष्ट्र.
● कार्याध्यक्ष - अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक महासंघ. ● अध्यक्ष - हसन मुश्रीफ साहेब बहुउद्देशीय संस्था, कोल्हापूर.
● अध्यक्ष - शिवशाही आघाडी, कोल्हापूर. ● संस्थापक - अध्यक्ष श्री महाकाली चॅरिटेबल ट्रस्ट, कोल्हापूर.

firoz - 9028107700




साप्ताहिक
# दिनमान
तत्वांचा सन्मान... मातीशी ईमान

संपादक : समीर मुजावर RNI NO. MAHMAR/2007/22212 कार्यकारी संपादक : सौ. नाजनीन मुजावर

वर्ष ११ वे : अंक ३ रा सोमवार ११ जून २०१८ पृष्ठे १६ : मूल्य ५ रुपये email : dinmaan@gmail.com (वार्षिक वर्गणी : रू २००/- सर्व विशेष अंकासह)



क्रिस्टल मस्जिद, मलेशिया

# मुस्लिमांच्या शैक्षणिक मागासलेपणाची खंत

## शिक्षणाच्या बाबतीत राज्यातील मुस्लीम समाज अजूनही मागे आहे. याची नेमकी कारणे काय आहेत?

सरकारी नोक-यांमध्ये अल्पसंख्याक मुस्लीम समाजाचे प्रमाण वाढण्यासाठी मुस्लीम युवकांनी स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असणारी मराठी भाषा चांगल्या पद्धतीने अवगत करणे गरजेचे आहे.केवळ मराठी भाषेतील अज्ञानच मुस्लीम समाजाच्या सरकारी नोक-यांमधील अल्प प्रमाणाचे कारण ठरू शकत नाही.स्पर्धा परीक्षा आणि परीक्षांच्या माध्यमातून पोलिस उपनिरीक्षक पदापासून उच्चपदापर्यंत पोहोचण्याची त्यांची इच्छा आणि त्यांच्यातील वैचारिक मागासलेपणा कारणीभूत आहे. केवळ आवाहने करून मुस्लीम तरुण-तरुणी स्पर्धा परीक्षांकडे वळणार नाहीत. स्पर्धा परीक्षा आणि मुस्लीम विद्यार्थी यांच्यात निर्माण झालेली दरी दूर करण्यासाठी हवी ठोस उपाययोजना आणि त्याची नियोजनबद्ध अंमलबजावणी.

सरकारी नोक-यांमध्ये मुस्लीम समाजाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे.गेल्या काही वर्षातील आकडेवारी पाहता प्रमाण कमी होत आहे म्हणण्यापेक्षा प्रमाण आधीपासूनच नगण्य असल्याचे दिसून येते. मात्र हे प्रमाण वाढावे, यासाठी कोणत्याही स्तरावरून प्रयत्न झालेले दिसून येत नाहीत. महाराष्ट्रातील मुस्लीम मुले बहुतांशी उर्दू माध्यमाच्या शिक्षणाकडे वळतात, असे म्हटले जाते. मात्र हे चित्रही सध्या विदारक झाले आहे. याची कारणेही वेगवेगळी आहेत. राज्यातील अनेक ठिकाणच्या विशेषत: ग्रामीण भागातील उर्दू माध्यमाच्या जि. प. स्तरावरील शाळा विद्यार्थ्यांअभावी ओस पडू लागल्या आहेत. पालकांमध्ये इंग्रजीची वाढती ओढ याला कारणीभूत आहेच.

अनेक मुस्लीम विद्यार्थ्यांना उर्दू शिक्षणाबरोबरच मराठी शिक्षण हवे असते. मात्र, दोन्ही माध्यमांचे शिक्षण एकत्रित घेता येत नसल्याने एकतर अशा विद्यार्थ्यांना मराठी भाषेला बाजूला ठेवून उर्दूचे शिक्षण घ्यावे लागते अथवा उर्दू शिक्षण बाजूला ठेवत पूर्णपणे मराठीकडे वळावे लागते. राज्यात पहिलीपासून इंग्रजी सक्तीचे धोरण राबवण्यापूर्वीच काही ठिकाणी मुस्लीम शिक्षण संस्थांनी प्राथमिक स्तरापासून सुरू केलेल्या उर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये इंग्रजी विषयाची जोड दिली. त्यामुळे सुरुवातीपासूनच उर्दू माध्यमाच्या सरकारच्या शाळा ओस पडू लागल्या. सरकारने पहिलीपासून इंग्रजीची योजना सुरू केली. उर्दू माध्यमातही ती सुरू आहे. मात्र महाराष्ट्रातील मुस्लीम समाज मराठी भाषेतही पुढे आला पाहिजे, अशी प्रामाणिक इच्छा हवी.उर्दू माध्यमातून बाहेर पडलेले हे विद्यार्थी पाचवीपासून पुढे उर्दूतील शिक्षण ग्रामीण भागात उपलब्ध नसल्याने एकतर पुढील शिक्षणापासून वंचित राहणे पसंत करतात अथवा पाचव्या इयत्तेत नाईलाजास्तव मराठी माध्यमात प्रवेश घेतात. मात्र त्यांचा शैक्षणिक आलेख मराठी भाषेतील अज्ञानामुळे प्रत्येक इयत्तेत खालावतो आणि असे अनेक विद्यार्थी दहावीपर्यंतही पोहोचत नाहीत. यासाठी उर्दू शाळेत पहिलीपासून मराठी मुळाक्षरांपासून जोडाक्षरांपर्यंतचे धडे मुस्लीम मुलांनी गिरवले, तर पुढील शिक्षणातील त्यांच्या डोक्यावरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होईल, असे वाटते.

महाराष्ट्रातील मुस्लीम समाज मराठी बोलत नाही, असे नाही. महाराष्ट्रात जन्मलेल्या प्रत्येक मुस्लीम नागरिक मराठीत संवाद साधू शकतो. मात्र जेव्हा प्रश्न शैक्षणिक स्तरावरचा येतो, तेव्हा मराठी मुस्लीम विद्यार्थी मागे पडल्याचे चित्र दिसून येते. महाराष्ट्रातील काही मुस्लीम वस्त्या अशा आहेत, की तिथे त्यांच्या घरात केवळ मराठी भाषेतूनच संवाद होतात. पश्चिम महाराष्ट्रातील इस्लामपूरच्या मोहल्ल्यातील नागरिकांचे उत्तम उदाहरण त्यानिमित्ताने देता येईल. कोकणातही असे काही मुस्लीम समाजातील लोक आहेत की त्यांच्या घरात केवळ मराठी संवाद ऐकू येतील. त्यांची मराठी ऐकून मुस्लीम समाजही इतक्या चांगल्यापणे मराठी भाषा बोलू शकतो, यावर विश्वास बसणार नाही. मुस्लीम मुलांमध्ये मराठीचे स्थान वाढवायचे असेल, तर मराठी भाषेच्या संस्कारांची गरज आहे.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील ३० टक्के आणि शहरी भागातील २५ टक्के मुस्लीम समाज हा आर्थिक दुर्बलतेमुळे शिक्षणापासून वंचित असल्याचे एका सर्वेक्षणातून स्पष्ट झाले आहे. त्यामुळेच कदाचित यूपीएससी, एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांपर्यंत पोहोचणा-या मुस्लीम तरुण-तरुणींचे प्रमाण नगण्य राहिले आहे. शिक्षण जमले नाही, तर मजुरी करून उदरनिर्वाह करायचा. महाराष्ट्रातील मुस्लीम लोकसंख्येच्या ३२.४ टक्के मुस्लीम मजूर म्हणून राबत आहेत. त्यात ग्रामीण भागाचे प्रमाण ३८.१२ टक्के आहे. महाराष्ट्रातील मुस्लीम युवक बेरोजगारीला कंटाळून अरब, आखाती देशात मजुरीसाठी पळतात. तांत्रिक शिक्षण घेऊन अनेक जण परदेशाची (पान ४ वर)

साप्ताहिक दिनमान



# मुस्लिमांच्या शैक्षणिक मागासलेपणाची खंत

(पान ३ वरुन) वाट धरतात. आर्थिक गाडा चालवण्यासाठी कुटुंब आणि देशापासून हे युवक दूर जातात. चार-चार, पाच-पाच वर्षेत्यांना घराकडे येण्यास मिळत नाही. तांत्रिक शिक्षण घेऊन बोटीवर पेंटरपासून वेटर पर्यंत मिळेल ती नोकरी करण्याचीही त्यांची तयारी असते. विशेषत: कोकणातील मुस्लीम तरुणांमध्ये या नोकरीकडे वळण्याचा कल अधिक दिसून येतो. मात्र सध्या परदेशातील अरब आणि आखाती देशातील या नोक-यांमध्ये महाराष्ट्रातील मुस्लीम तरुणांपुढे प्रश्न निर्माण झाला आहे. केरळी आणि मद्रासी नागरिकांनी यावर आता आपली सत्ता मिळवली आहे. कमी पगारातही ही मंडळी नोकरी करण्यास तयार होतात. त्यामुळे महाराष्ट्रातील मुस्लीम तरुणांपुढे अडचणी निर्माण झाल्या. मुस्लीम विद्यार्थ्यांमध्ये बुद्धिमत्ता नसल्याने ते अशा नोक-यांचा आहारी जातात आणि स्पर्धापरीक्षांकडे वळत नाहीत, असेही म्हणणे चुकीचे ठरेल. बोटीवर अगदी हेल्पर म्हणून काम करण्यास सुरुवात केलेला मुस्लीम युवक कॅप्टनपदापर्यंत पोहोचल्याची अनेक उदाहरणे कोकणात आहेत. उच्चशिक्षण घेऊन परदेशात वैद्यकीय, अभियांत्रिकी क्षेत्रात काम करणारे महाराष्ट्रातील अनेक मुस्लीम आहेत. अशा होतकरू आणि बौद्धिक क्षमतेच्या तरुणांना केंद्र व राज्य सरकारच्या प्रशासकीय नोक-यांकडे वळवण्यासाठी त्यांना योग्य दिशा देण्याची गरज आहे. महाराष्ट्राच्या पोलिस दलात मुस्लिमांचे प्रमाण अवघा एक टक्का आहे. संपूर्ण भारतातले हे प्रमाण ६ टक्के आहे. राज्यातला ग्रामीण मुस्लीम विद्यार्थी स्पर्धा परीक्षातील योग्य मार्गदर्शनापासून वंचित राहिला आहे.

केंद्र व राज्याच्या काही चांगल्या योजना सामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी मुस्लीम नेत्यांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. सामाजिकतेचा शिक्का मारून मुस्लिमांच्या विकासासाठी कार्यरत असणा-या ढिगभर संस्था महाराष्ट्रात आहेत. या संस्थांनी जर अशा योजना तळागाळातील मुस्लीम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून स्पर्धा परीक्षांच्या पात्रतेच्या विद्यार्थ्यांचा शोध घेतल्यास प्रशासकीय सेवेतील मुस्लिमांचे प्रमाण वाढण्यास निश्चितच मदत होईल.

◆◆◆

# बैतुल माल कमिटी : गोरगरिबांना आशेचा किरण

कोल्हापूर (समीर मुजावर) : तुम जामिनवालो पर रहम करो आस्मानवाला तुमपर रहम करेगा अगदी याच उक्ती प्रमाणे कोल्हापूर जिल्हा बैतुलमाल कमिटीचे कार्य गेल्या १० वर्षेअखंडपणे आणि निस्वार्थीपणे सुरू आहे.या कमिटीत सुरुवातीपासूनच सर्व जातीधर्मांचे लोक मनोभावे सेवा देत आहेत. राजर्षी शाहूंच्या या कोल्हापूर नगरीत सर्वधर्म समभाव आणि एकोपा जपत सामाजिक जाणीवेतून चालणाऱ्या या कार्याचे आचरण करून समाजाप्रती प्रत्येकाने आदर ठेवावा हाच या कार्याचा उद्देश आहे.


काही वर्षापूर्वी बैतुलमाल कमिटीचे काही युवक पहाटेच्या सुमारास चर्चा करत बसले होते, त्यावेळी एका कोपऱ्यात एक इसम ओक्साबोक्सी रडत होता आणि परमेश्वराकडे दुआ करत होता.या युवकांना त्याचे रडणे ऐकून त्याची विचारपूस करावीशी वाटली.म्हणून जवळ जाऊन विचारले असता त्याने जे सांगितले ते अतिशय धक्कादायक असे होते. दुआ करणाऱ्या त्या इसमाच्या पत्नीला एका दवाखान्यात बाळंतपणासाठी दाखल करण्यात आले होते.तो आर्थिक परिस्थितीमुळे हतबल झाला होता. त्यावेळी त्या माणसाला सहकार्य करणे आवश्यक होते.त्याची ती अवस्था पाहून दया आलेल्या या युवकांनी उपस्थित आपल्या सर्व सहकाऱ्यांना आवाहन केले आणि तब्बल पावणे दोन हजार रुपये जमा झाले.ती रक्कम देऊन त्या गरजूची वेळ निघाली पण त्या सामाजिक कणव असलेल्या सर्व तरुणांनी गरजवंताला यापुढे लागेल ती मदत निस्पृहपणे करायचीच असा चंग बांधला. आणि घामाच्या,कष्टाच्या पैशातून गरजवंतांना सहाय्य करणाऱ्या कोल्हापूर जिल्हा बैतुलमाल कमिटीचा जन्म झाला.त्यानंतर चार वर्षेया सामाजिक जाणिवेने प्रेरित झालेल्या तरुणांनी अत्यंत तड्पेने काम केले. वयोवृद्ध, विधवांना, रुग्णांना, शालेय विद्यार्थ्यांना आणि सर्व जातीधर्मातील गोरगरीबांना लागेल ती मदत पोहचवण्याचे कार्य सुरू झाले. कोल्हापूरमध्ये कष्टाच्या कमाईवर उदरनिर्वाह करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. आपल्या दिवसभराच्या घामाच्या कमाईतून थोडा हिस्सा समाजासाठी देणाऱ्या या दातृत्वशील लोकांनी या हाताची खबर त्या हाताला न देता आपले काम सुरू ठेवले. बघता बघता कोल्हापूर जिल्हा बैतुलमाल कमिटीचा विस्तार होत गेला. हजारो युवक अगदी मनापासून या समाजकार्यात झोकून देऊन कार्यरत आहेत. ज्यांच्या घरी कुणी कमावणारं नाही, ज्यांना उदरनिर्वाह (पान ९ वर)


















# खरचं भारत धर्मनिरपेक्ष आहे काय?

धर्माधर्मात भेदभाव न करता प्रत्येक धर्माला समान वागणूक देणे म्हणजे धर्मनिरपेक्षता. आपली धर्मनिरपेक्षतेची दुसरी व्याख्या काय ? एका धर्माचा तिरस्कार करणे म्हणजे धर्मनिरपेक्षता ? की निवडणुकीत मते मिळवण्यासाठी एखाद्या विशिष्ट धर्माच्या सोयीसवलती देत बाकी धर्माच्या अवहेलना करणे म्हणजे धर्मनिरपेक्षता काय ?

देशात धर्मनिरपेक्षता अजिबात नाही. धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली अनेक धर्मामध्ये भांडणे लावण्याचं काम धूर्त राजकारणी करत आहेत.कोणतीच भाषा कोणत्याच धर्माची मक्तेदारी नाही. उर्दू भाषा सुध्दा कुण्या एकाची जबाबदारी नाही. मात्र उर्दू भाषा इस्लामशी जोडण्याचे गलिच्छ राजकारण केले जाते. सर्वसामान्य मनात जातीयता वाढवून विषकाळवण्याचे अघोरी प्रकार कावेबाज राजकारणी करतात. गेल्या वर्षी सिद्दी या मुलीने गीता पठणात प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या पंतप्रधानाच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यासारखे चांगले प्रयत्न होत असून सुद्धा समाजमध्ये धर्माधर्मात फूट पडण्याचे काम काही कावेबाज मंडळी करत आहेत. धर्मनिरपेक्षता ही कोणत्याचं धर्माच्या विरोधात नसते. पण सद्या जाती जातीत तेढ निर्माण करण्याचे षड्यंत्र रचले जात आहे.

एखादया धार्मिक मुद्द्यावर धर्माच्या नावावर सद्याच्या काळात राजकारण केले जात आहे. स्वतःला धर्मनिरपेक्ष म्हणवुन घेणारे पक्षच सर्वाधिक प्रमाणात धार्मिक भावनांचे गलिच्छ राजकारण करतात, आणि सत्ता उपभोगतात. खरं तर आपल्या देशात सर्वच राजकारण धर्म व जातीभोवती फिरत आहे. आपल्या प्रत्येक नेत्याला विशिष्ट धर्माचे किंवा जातीचे नेते म्हणूनच पाहिले जाते. त्यामुळे आपल्याकडे राष्ट्रभावना, राष्ट्रविकास, राष्ट्रीय अस्मिता या गोष्टी दुय्यम ठरवून आरक्षण, सवलती, प्रादेशिक वाद या गोष्टीचा बोलबाला जास्त आहे. आज २१ व्या शतकातही आपण हिंदू-मुस्लिम, ब्राम्हण-मराठा, उच्च कुळ-नीच कुळ यात अडकून पडतो.

'आपल्या धर्माबद्दल अभिमान जरूर असावा परंतु दुसऱ्याच्या धर्माचा द्वेष नसावा.' आपल्या धर्माचा आदर बाळगताना या गोष्टीचा फायदा गलिच्छ राजकारण्यांना होणार नाही यांचाही विचार करायला हवा. आम्ही धर्मनिरपेक्ष,आम्ही सर्वांना समान वागणूक देतो. हे दाखवण्यासाठी हिंदू धर्माचा तिरस्कार करून धर्माविषयी विशेष आपुलकी दाखवण्याचे काम गलिच्छ राजकारणी करतात. ते लोकांना स्वतः च्या राजकीय स्वार्थासाठी भावनिक मुद्द्याला हात घालून जनमतामध्ये (पान १४ वर)


















# मुसलमानांनी विचार करण्यासारखा मुद्दा

या देशातील अल्पसंख्याकांनी त्यांचे योग्य स्थान कोणते आहे व त्यांनी करण्यायोग्य कार्य कोणते आहे? याचा नीट विचार करायला हवा. ही गोष्ट खरी आहे की तोंडी काहीही म्हटले जात असले, तरी प्रत्यक्षात देशाच्या शासन व्यवस्थेमध्ये, एक सांस्कृतिक समुदायाच्या नात्याने अल्पसंख्याकांचा कसलाही वाटा नाही. मग काय, केवळ बहुसंख्याकांचे हल्ले थोपविणे आणि शासन-व्यवस्थेत काही हिस्सा मिळविण्यात आपली सर्व शक्ती खर्ची घालणे, इतकेच तुमचे कर्तव्य आहे? मग देश कोठेही जावो, तुम्ही संख्येने कमी आहात, म्हणून दुर्बल आहात, असा तुमचा समज आहे, परंतु निर्णायक शक्ती ही संख्येचा कमी-अधिकपणा नसून, ती मानवतेच्या गुणांवर असते. संख्या कमी असणे हा अपराध नसून, जगाला देण्यासाठी तुम्हापाशी कोणतीही देणगी नाही, हा वास्तविक अपराध आहे.

तुम्हापाशी उन्नत व सच्चरित्र समाज निर्माण करण्याचे सिध्दान्त आहेत आणि आपली तत्त्वे पटविण्यासाठी व आदराचे स्थान मिळविण्यासाठी आवश्यक असणारे नैतिक बल आहे, तर संख्येने तुम्ही कमी असलात तरी पर्वा नाही. कोणत्याही मानव समुहास वजन व प्रतिष्ठा निर्माण करणारी बाब त्यांची संख्या नसते, तर त्यांच्या जीवनाचे सिध्दान्त व उच्च नैतिक चारित्र्याचे विभूषण मानव-समुदायात वजन व प्रतिष्ठा निर्माण करते. खेदाची गोष्ट अशी आहे की तिकडे तुमची नजर वळत नाही.

पहिली गोष्ट अशी आहे की तुमचे दृष्टिकोन व तुमचे व्यवहार यांना आपल्या सांस्कृतिक वर्तुळात वेढून घेतले आहे. फार तर अनेक अल्पसंख्याकांशी संघटन करुन संयुक्त आघाडी उभारण्यापलीकडे तुम्ही जात नाही. हे सर्व उपाय स्वरक्षणाचे आहेत.

हे उपाय यशस्वी जरी झाले, तर तुम्ही थोडक्यात अधिक शक्तीनिशी संघर्ष करु शकाल अथवा राजकारणात काही तात्कालिक लाभ मिळवू शकाल, यापेक्षा अधिक काही लाभ होणार नाही. हे नकारात्मक धोरण आहे. एखाद्या संकटाच्या भयाच्या भावनेने जे लोक एकत्र येतात, ते अधिक काळापर्यंत एकत्रित राहू शकत नाहीत. संकट नाहीसे झाले की ते विघटित होऊन विखुरले जातात. तुम्हापाशी जर सामाजिक सिध्दान्त काही सकारात्मक उद्देश व आकर्षून घेण्याची शक्ती नसेल, तर केवळ राजकारणाच्या लाभासाठी एकत्रित येणारे अल्पसंख्याकांचे समूह आपापसात डोकेफोड करुन एक वेगळाच उपद्रव निर्माण करण्यास कारणीभूत होतील. एखाद्या अल्पसंख्य समूहाला जर आदराचे स्थान प्राप्त करायचे असेल, तर त्याला एकच उपाय आहे. त्याने देशापुढे असे तत्त्व मांडावे, ज्यामुळे देशातील सद्यस्थितीतील विघटन वादावर व दुरावस्थेवर उपाय सिध्द होईल आणि त्यांनी स्वतःमध्ये अशी गुणवैशिष्ट्ये निर्माण करावीत ज्यांचा स्वीकार करण्यास जातीयवादी व्यक्तीही बाध्य होईल.

मुसलमानांची वास्तवता अशी आहे की विभिन्न ऐतिहासिक आणि भौगोलिक परिस्थितींच्या कारणास्तव याच समुदायाला परिस्थितीचा ताणतणाव व दंगलींचे चटके सर्वपिक्षा अधिक बसले आहेत. त्याची बाह्य कारणे आहेत. तशी अंतर्गत कारणेही आहेत. दुसऱ्याचा आततायीपणा त्याला कारण आहे, तर स्वतःच्या काही उणिवांही त्याला कारणीभूत आहेत.

दुसऱ्यांच्या चुकांबाबतचे विवेचन करायचे तर ते रसभरीत असते यात संशय नाही. त्यावरुन असे वाटू लागते की अपराध आपला नसून इतरांचा आहे, परंतु हा प्रकार हितकारक नाही. सत्य असे आहे की बल किंवा दुर्बलता, यांचे उगमस्थान आपल्या उद्दिष्टांबद्दल प्रेम असेल आणि नैतिक चारित्र्याचे बल असेल,तर बाह्य परिस्थितीचे महत्त्व कस्पटा इतके असते. ते सुकलेल्या पालापाचोळ्या-सारखे असतील तर सोसाट्याचा वारा त्यांना सहज उडवून टाकील.

मुसलमानांचा इतिहास साक्ष आहे की त्यांना इतर कोणीही हानी पोहचवू शकला नाही. त्यांनी आपल्या रक्तधमन्या उत्स्फूर्तपणे कापण्यात तत्परता दाखविली आहे. आज देशातील आपल्या अवस्थेवर विचार करा. मुसलमान लोक आजपर्यंत ही गोष्ट निश्चित करु शकले नाहीत की देशात त्यांचे स्थान कोणते आहे. दिवास्वप्नातून बाहेर पडून पाहिले गेल्यास (पान ८ वर)








सर्व हिंदू-मुस्लिम बांधवाना रमजान ईदच्या हार्दिक शुभेच्छा !

Prof. Imran I. Pathan
B.E.Civil, PGD.ACM.(NICMAR)
9850555981

Frenz Greenearth

FAIR MATE

An ISO 9001, ISO (EMS) 14001 & OHSAS 18001 Certified Company
In technical collaboration with RBP Ltd. UK
CONSTRUCTION CHEMICALS - Tile Adhesives, AAC Block Chemicals, Waterproofing Chemicals, Readymade Plasters etc.

Authorised Distributor
Frenz Greenearth Technologies Pvt. Ltd.
Shop No. 1, BB Building, Mangeshkar Nagar, Subhash Road, Kolhapur, Maharashtra - 416 012
info@frenzgreenearth.com

सर्व हिंदू-मुस्लिम बांधवांना
रमजान ईदच्या हार्दिक शुभेच्छा !

Life Style

- BAUXITE TRADING
- CONSTRUCTION COMPANY
- EARTH MOVER & TRANSPORT
- GOV. RECO. SAND CONTRACTOR
- MILLS SCALE

Powered By : Parvej
472, B Ward, Mangalwar Peth, Near Karveer Nagar Wachanalay.
Contact : 0231-6452755, 2540555, +91-9890130555, +91-9890619292

संपर्क : मोबा. ९८२३२०७८६०/ ९४०३१०७८६०
साप्ताहिक दिनमान लवकरच सुरू होत आहे
नव्या रूपात... नव्या ढंगात...
साप्ताहिक दिनमान
तत्वांचा सन्मान... मातीशी ईमान
वार्षिक वर्गणी
केवळ २०० रुपये



# रमजान व त्याचा बोध

निश्चितच माणसाचे प्रत्येक कर्म अल्लाहपाशी वाढते. एक पुण्यकर्म सातशे पटीपर्यंतही वाढते. मात्र उपवासाबाबत अल्लाहचे फर्मान असे आहे की उपवास हा मर्यादेपलीकडे आहे. तो विशेषकरून माझ्यासाठी आहे आणि मी त्याचा हवा तितका मोबदला देतो. रमजान-१ ते शवाल-१ हा कालावधी म्हणजे रमजान महिन्याचे २९/३० दिवस व ह्या पुढचा इद-उल-फित्र अर्थात रमजान ईदचा दिवस होय.

अल्लाहचे वरील फर्मानावरून उपवासाची थोरवी स्पष्ट होते. अशी ही थोरवी प्राप्त असणारे उपवास आणि त्यानुषंगाने असणाऱ्या अन्य इबादतबाबत येथे कांही विचार प्रकट आहेत.

उपवास सामान्यत: ऋतु-मानानुसार ११ ते १५ तासापर्यंतचे असतात. हिवाळी काळ कमी असतो तर उन्हाळी जास्त असतो. काही उपवासधारक आपल्या व कुटुंबाच्या उपजिवीकेसाठी काहीवेळा शेतात, कारखान्यात काम करतात. स्त्रियानाही घरांत ज्यांचे उपवास नसतात त्यांच्याकरिता जेवण तयार करावे लागतेच.उन्हाळी एक तर उन्हाचा त्रास आणि कालावधीही मोठा यामुळे साहजिकच उपवासधारकास भूक-तहानेच्या यातना होत असतात. परंतु ज्या कारणाने त्यांचे उपवास असतात ते कारण म्हणजे अल्लाहप्रती प्रेम आणि अल्लाहचे आज्ञापालन. अल्लाह देखील उपवास-धारकांच्या प्रेम आणि आज्ञा पालनाची मनीषा यास प्रतिसाद देऊन उपवास-धारकांचे मनोबल उंचावतो आणि उपवासधारक आपले उपवास पूर्ण करू शकतात.

मात्र हे उपवास पूर्ण करताना उपवासास बाधा पोहचवणाऱ्या ज्या बाबी आहेत त्या उपवासाचे कालावधीत कटाक्षाने टाळावयाच्या असतात. अशा टाळावयाच्या बाबी म्हणजे खोटे बोलणे,निंदा नालस्ती करणे, भ्रष्टाचार अन्याय, जुलुम जबरदस्ती, चहाड्या, भांडण-तंटे तसेच दारू, तंबाखूचे सेवन जुगार अशा अनैतिक बाबी बरोबर शारीरिक वासनेपासून दूर राहणे यासारख्या होत. उपवासाचे कालावधीतील भूक-तहान जरी सहन करावी लागली तरी त्याचे फायदे अनेक आहेत. उदा. आपण स्वत: भूक-तहान सोसलेने जे गोर-गरीब अन्नालाकित्येक दिवस पारखे राहतात त्यांचे दु:ख कळते व मनांत सहानुभूति निर्माण होते. भूक-तहान सोसल्याने जो संयम आणिसबूरी तसेच धैर्य, चिकाटी प्राप्त होते आणि या बाबी रोगराई, दुष्काळ, युद्धासारख्या प्रसंगाना सामोरे जाताना उपयोगी पडतात. तसेच उपवासामुळे अन्नाचे सेवन कमी प्रमाणात झालेने पोटांतील सर्व अवयवांना विश्रांती मिळते व प्रकृतीसही ते पोषक ठरते. उपर्निर्दीष्ट सहानूभूति इस्लामने अनिवार्य केलेली जकात आदा करणे कामीही प्रेरणादायी ठरते.

रमजानचे उपवासांबरोबरच लैलुतुल कद्रची इबादत करणेचे भाग्य लाभलेले अल्लाहचे भक्त या रात्री यथाशक्ती इबादत करून अल्लाहची प्रसन्नता लाभण्यासाठी प्रयत्नशील असतात. तसेच या रमजानमहिन्याचे शेवटचे दहा दिवस एतिकाफ करतात. या दहा दिवसांत आप्तेष्ट, कुटुंब यांचेपासून दूर राहवे लागते आणि असे हे दूर राहणे हाजी लोकाना हज समयी प्रेरणादायी ठरते.

अशा तऱ्हेने रमजानचे उपवास पूर्ण होताच दिवस उजाडतो तो शवाल महीन्याचा पहिला दिवस. मात्र तो शवालचा दिवस म्हणून वाटतच नसतो कारणयाच दिवशी इद-उल-फित्र अर्थात रमजान ईद साजरी होत असते ही ईद साजरी होण्यापूर्वी गरीब लोकांना विशेषकरून गरीब आप्तेष्ट गरीब शेजारी याना ईदमध्येसामील होता यावे म्हणून फित्रा रूपात मदत देणे अनिवार्य असते. ही मदत ईदपूर्वीच द्यावयाची असते आणि जकात प्रमाणेच आनंदी मनाने द्यावयाची असते जेणेकरून ती स्वीकारणारास उपकाराच्या भावनेचा स्पर्शही होऊ नये. आणि हे सर्व करताना जे यश प्राप्त झालेले असते त्या यशाचा आनंद व्यक्त करण्यापूर्वी मिळालेले यश हे अल्लाहची कृपा व मदतीमुळे मिळालेले (पान ८ वर)

सर्व हिंदू-मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या हार्दिक शुभेच्छा !



Shadab Attar

RASIKA TRAVELS PVT.LTD.
ATTAR GROUP

RASIKA TRAVELS PVT. LTD.

Biggest Little Travel Agency

Tel.: (0231) 2666352, 2660113, Fax : 2664007, Direct : 3201352,
Resi. : (0231) 2692295, Cell : 9822442289, 9923571010

300/B, 'E' Ward, Baker Lane Corner, New Shahupuri, Kolhapur 416 001. M.S.(India)

E-mail : rasikatrv@yahoo.com, rasikatrv@gmail.com

100 Bedded Multi-Faceted
Multi-Speciality Hospital



CITY HOSPITAL

EMERGENCY HELPLINE 88 56 900 900 / 97 63 757 080

THE ONLY TRAUMA CENTER TO PROVIDE NEUROSURGERY, PLASTIC & MICROVASCULAR SURGERY, ORTHOPEDIC, GENERAL SURGERY, GENERAL MEDICINE & PSYCHIATRY, UNDER ONE ROOF

- Advanced Centre for all types of Brain tumours, Brain hemorrhage, Aneurysm, Vascular Malformation of brain & spine, Spinal tumours & fractures.
- Plastic Surgery, Cosmetic Surgery & Micro-Vascular Surgery.
- Orthopedic Surgery, Arthroscopy & Joint Replacement Centre.
- Psychiatry, Neuropsychiatry & De-addiction Centre.
- General Medicine & Dialysis centre.
- General Surgery, Laparoscopic Surgery & Endoscopic Surgery.

Salient Features

- 17 Bedded Critical Care ICU
- 10 Bedded Semi ICU - Step Down ICU
- High Dependency Unit for Burns
- Comprehensive Poly Trauma Care Centre
- 3 Modern Modular Operation Theaters with Laminar Air Flow.
- 24 hrs. In house CT Scan, X-Ray, Pathology Services.
- 24 hrs. Ambulance service.

Dr. Veerendrasinh S. Pawar
MS.MCh.DNB.(Neurosurgery) - KEM, Mumbai
Consultant Brain, Spine, Micro Neuro Vascular & Trauma, Surgeon
Founder & Head - Department of Neuro Surgery at CITY HOSPITAL, Kolhapur

Dr. Archana V. Pawar
MS.MCh.(Plastic Surgery) - KEM, Mumbai
Consultant Plastic , Reconstructive, Cosmetic & Micro-Vascular Surgeon.
Founder & Head - Department of Plastic Surgery & Burns at CITY HOSPITAL,Kolhapur

Dr. Vaishali V. Gaikwad
MS.(General Surgery), FIAS, FIAGES
Consultant General, Laparoscopic & Endoscopic Surgeon

Dr. Dhananjay G. Patil
MD (Psychiatry) MIPS. MIAPP.
Consultant Neuro Psychiatrist

Dr. Pradeep B. Patil
MS. D'Ortho, DNB. (Orthopaedics)
Consultant Orthopaedic, Trauma & Joint Replacement Surgeon

Dr. Sagar Patil
MD (General Medicine)
Consultant, Physician & Intensivist

Dr. Avinash Upadhye
MBBS, D.A.
Consultant Anaesthesiologist & Intensivist

Ms. Shalmali Ranmale
MA., M.Phil. (Cli. Psy.)
Clinical Psychologist & Psychotherapist

1708/E, 8th Lane, Main Road, Rajarampuri, KOLHAPUR - 416 008.
Ph.No. 0231-2534322, 2534323 Email : cityhospitalkop@gmail.com


अल्पावधीतच तब्बल
1,50,000
वाचकांच्या पसंतीस
उतरलेले
Live दिनमान.com
तत्वांचा सन्मान... मातीशी ईमान
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी
खालील लिंकवर क्लिक करा...
www.livedinmaan.com

तुम्हाला तुमच्या डोक्याशिवाय सगळीकडे
केस पसरलेले दिसताहेत?

त्यांच्यावर सुरक्षित, खात्रीशीर आणि वैज्ञानिक होमिओपथी ट्रिटमेंटने मूळापासून उपचार करा.

099308-22775
www.drbatras.com

Dr Batra's
HOMEOPATHY
LONDON • DUBAI • INDIA






कोल्हापूर येथील क्लिनिक : शाहूपुरी : ०२३१-२५२२७१० | ताराबाई पार्क : ०२३१-२६६३४९९

# मुसलमानांनी विचार करण्यासारखा मुद्दा

(पान ६ वरुन) स्पष्टपणे दिसून येईल की येथे मुसलमानांना शासनशक्तीचा दर्जा नाही. गैरइस्लामी सिध्दान्तांचा स्वीकार करून आणि गैरइस्लामी पक्षांच्या शिस्तीच्या बंधनात बाधा होऊन दोन-चार मुस्लीम लोकच शासनाच्या उच्चपदावर बसले, हा शासनामध्ये मुसलमानांचा हिस्सा आहे, याचा पुरावा ठरत नाही. या स्वप्रतारणेने मुसलमानांचे स्थान व त्यांच्या व्यवहाराची प्रकरणे अधिक गुंतागुंतीची करुन टाकली आहेत. त्याहीपेक्षा मुसलमानांची अधिक हानी त्या फसगतीमुळे झाली आहे, जी त्यांनी स्वतःच करुन घेतली आहे. मुसलमान इतर अल्पसंख्याकांप्रमाणे अल्पसंख्य आहेत अगर इतर बहुसंख्याकांप्रमाणे बहुसंख्य आहेत, हे त्यांचे खरेखुरे स्थानच नव्हे.

सर्वप्रथम, ते नैतिकतेचे शिक्षक आहेत. मुसलमान लोक अभिमानाने ही गोष्ट अवश्य म्हणतात की ते सर्वोत्तम समुदाय (खैरेउम्मत) आहे आणि भल्या कृत्यांचा आदेश देण्यासाठी आणि दुष्कृत्यांचा नायनाट करण्यासाठी त्यांना निर्माण केले गेले आहे. पण त्यांनी सर्वोत्तम समुदाय (खैरेउम्मत) असण्याचा अर्थही पुरेपूर समजून घेतला नाही व प्रत्यक्ष व्यवहारात तशी सेवा देण्याची त्यांची तयारीही नाही. याचाच परिणाम असा निघाला की ज्यांना नीतिचारित्र्याचे पुतळेच नव्हे तर नैतिकतेचे रक्षक असायला हवे होते, त्यांच्या स्वतःची नैतिकता व चारित्र्य लपून राहिलेले नाही.

ज्यांना शिसे ओतलेल्या भिंतीसारखे भक्कम असायला हवे होते, तेच सर्वांपेक्षा अधिक विखुरलेले आहेत. मुसलमानांची दृष्टी आपल्या चुकांवर व उणिवांवर कधी पडत जरी असली, तरी ईश्वराची प्रार्थना आणि सुप्रसिध्द नैतिक त्रुटींपासून अलिप्तता, यांच्यापुढे त्यांची मजल जातच नाही. फारच थोड्या मुसलमानांची दृष्टी त्या मर्यादेपर्यंत पोहोचते की, सर्वप्रथम ते काही सिध्दन्तांचे अनुयायी आहेत आणि ईश मार्गदर्शनाचे (हिदायते इलाही) विश्वस्त (अमीन) आहेत. आमचे सर्वप्रथम कर्तव्य हे आहे की या शिकवणीचा जगातील सर्व लोकांपर्यंत प्रसार करावा. म्हणून आम्ही स्वतः ईश्वराची आराधना करीत राहावे व नीतीमत्तेवाले बनून राहावे एवढेच पुरेसे नाही.

याच्याही पुढे जाऊन आम्हाला नैतिकतेचे शिक्षक व रक्षक व्हायला हवे.काही भौतिक लाभासाठी आणि काही आदर-प्रतिष्ठेसाठी संघर्ष करण्यात आणि लढण्या-मरण्यात आपली सर्व शक्ती खर्ची घालण्यासाठी आमचे जीवन नाही. किंबहुना ज्या सिध्दान्तावर आम्ही श्रध्दा (ईमान) धारण केली, त्यांच्या खातर आपल्या प्राणांचे बलिदान करण्याची शक्ती स्वतःमध्ये निर्माण करणे आणि पक्षहिताच्या वर येऊन, मानवतेची सेवा करण्याचे आपले लक्ष्य बनवून कार्य करावे आणि अशा प्रकारे स्वतःला दुःखी मानवजातीचा मुक्तीदाता सिध्द करावे.

◆◆◆

# रमजान व त्याचा बोध

(पान ७ वरुन) असल्याने त्याचे आभार ईदच्या नमाज मध्ये व्यक्त करून नंतर ईद अर्थात आनंदी आनंद या आनंदात जो सर्वधर्म समभाव असतो तो पाहून इस्लामचे समानतेचे तत्व मस्जिदमधील नमाजमध्ये जसे आढळून येते तसेच या इद-उल-फित्र अर्थात रमजान इदमध्येही दिसून येते. इद मुबारक, इद मुबारकच्या निनादात इदचा दिवसही केव्हा संपतो तेही कळत नाही.

**वंचितांच्या जीवनात आनंद वाटण्याचा उत्सव रमजान ईद :**

रमजानच्या महिन्यात महिनाभर उपवास करून घरातील प्रत्येक व्यक्तीच्या मोबदल्यात अडीच किलो धान्य किंवा त्याची रक्कम गरजवंतांच्या घरी नेऊन दिली जाते. तसेच जकात आकारुन मुस्लीम समाजातील वंचितांसाठी विविध खर्च करण्याची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरु आहे. ईदच्या नमाजानंतर मोठ्या व्यक्तींकडून लहानांना ईदी दिली जाते. तसेच वंचितांसाठी विविध वस्तू भेट देऊन त्यांच्या जीवनात आनंद फुलविण्याची परंपरा मुस्लीम बांधवांनी गेल्या अनेक वर्षांपासून जपली आहे.

याबाबत माहिती देताना डॉ. इक्राम खान म्हणाले की, रमजान ईदचे मूळ नाव ईद-उल-फित्र हे आहे.सदका-ए- फित्र या दानापासून हे नाव तयार झाले आहे. सदका-ए- फित्र म्हणजे ईदच्या नमाजापूर्वी घरातील प्रत्येक व्यक्तीच्या मोबदल्यात अडीच किलो धान्य किंवा त्या धान्याची रक्कम गरजवंतांना त्यांच्या घरी नेऊन द्यावी. रमजान महिन्यात महिनाभर उपवास (रोजे) केले जातात.या महिन्यात जकात कर आकारला जातो. एकूण उत्पन्नाच्या रकमेतून ५२.५ तोळे चांदी किंवा ७.५ तोळे सोन्याचे दागिने यापेक्षा जास्त असणाऱ्या रकमेवर. २.५ टक्के रक्कम वंचितासाठी खर्च करणे आवश्यक असते. यालाच जकात असे संबोधले जाते.जकात ची जमा झालेली रक्कम समाजातील वंचित घटकांसाठी खर्च केली जाते, कुणी भुकेला राहू नये, कुणी असंतुष्ट असू नये यासाठी या रकमेतून विविध वस्तू खरेदी करुन दिल्या जातात. वंचितांच्या जीवनात आनंद यावा, यासाठी त्यांना त्यांच्या घरी नेऊन दान द्यायचे असते.वंचितांना आपल्या आनंदात सामावून घेण्याचा हा सण आहे. रमजाननंतर येणाऱ्या ईदला मोबदल्याचा दिवस म्हणतात महिनाभरातील उपवास, काम, दान पाहून प्रत्येकाला मोबदला दिला जातो. रमजान महिन्यात दिवसभरात पाच नमाज अदा केल्या जातात. तर ईदच्या दिवशी सहा नमाज करण्याची प्रथा आहे. नमाज झाल्यानंतर एकमेकांच्या गळाभेटी घेऊन ज्यांच्या घरी कुणी मयत झाले असेल त्यांच्या घरी जाऊन सांत्वन केले जाते. त्यांना खाऊ घातले जाते आणि मग स्वतःच्या घरी जाण्याची परंपरा ईदच्या दिवशी आहे.

रमजान हा निव्वळ आनंद साजरा करण्याचा महिना नाही, तर तो इतरांचे दुःख हलके करण्याचाही महिना आहे. ईद साजरी करण्याच्या प्रथा जगभर वेगवेगळ्या आहेत. भारतात दुधाचे पदार्थ मोठ्या प्रमाणात केले जातात.

◆◆◆
















# बैतुल माल कमिटी : गोरगरिबांना आशेचा किरण

(पान ४ वरुन) चालवण्यासाठी मदतीची गरज आहे अशा तब्बल १४० सर्व जातीधर्माच्या घरात गेल्या काही वर्षांपासून महिन्याभराचा बाजार भरून दिला जातो आहे,ज्या घरात लग्नाची मुलगी आहे; पण लग्नाचा खर्च पेलवणं आई-वडीलाला शक्य नाही.अथवा वडीलांचे छत्र हरपलेल्या आणि विधवा आईने सांभाळ केलेल्या अशा मुलींच्या लग्नाचा सर्व खर्च बैतुल माल कमिटीच्या माध्यमातून करण्यात येतो. वर्षभरात तब्बल ५५ ते ६० गरीब, अनाथ, बेसहारा मुलींचे विवाह करून देण्याची जबाबदारी बैतुलमाल कमिटी करत आहे. एवढंच काय, कित्येक गोरगरीब आणि गरजू रुग्णांच्या घरात औषधे पोहचवली जात आहेत. वर्षभरात शेकडो विविध शस्त्रक्रिया करून गरीब रुग्णांना दिलासा दिला आहे. तर उपचार घेणाऱ्या परंतु आर्थिक परिस्थितीने कमकुवत असणार्या रुग्णांचा रुग्णालयाचा उपचार खर्च सुद्धा भागवला जात आहे. कधी अचानक उद्‌भवणाऱ्या आपत्तीसाठीही हे तरुण तत्परतेने धावून येतात.त्यांनी अशा प्रसंगात गेल्या वर्षभरात तब्बल ४० ते ५० लाख रुपयांची गोर-गरिबांना मदत केली आहे. गरिबांचा दुआ वाटून घेताना खरंच ज्याला आपण मदत करणार आहोत, तो गरजवंत आहे का याची चाचपणी सुद्धा केली जाते. या चाचपणीत खरा ठरणाऱ्याला कोणतीही तमा न बाळगता लागेल ती मदत पुरवली जाते.

केवळ एका मोबाईल संदेशावर हे अनेक तरुण अवघ्या काही मिनिटांत जमा होतात. प्रत्येक सदस्याला काम वाटून देण्यात आले आहे. ६० वृद्ध महिला ज्यात केवळ मुस्लिम नव्हे तर १० ते १२ इतर जाती धर्माच्या सुद्धा वृद्ध महिला आहेत, अशांना त्यांच्या वयानुसार केलेले त्यांचे सर्व हट्ट पुरवण्यासाठी कमिटी जातीने लक्ष ठेवून काम करते. कमिटीच्या सदस्यांसोबत सुरु असलेल्या चर्चेतून असे समजले कि, एक वृद्धा जिला दररोज चपाती बरोबर श्रीखंड खायला आवडते आणि आता तर ती तिची सवय बनून गेली आहे. या वृद्धेला तिची ही सवय स्वतःच्या आईप्रमाणे जपून पूर्ण करताना बैतुलमाल कमिटीचे सदस्य कोठेही कमी पडत नाहीत. काही वृद्धा तर असा हट्ट करतात कि त्यांना हव्या असणाऱ्या साड्या त्याच स्वतः दुकानात जावून खरेदी करणार.अशावेळी कमिटीचे सदस्य आपल्या आईप्रमाणे त्यांच्या सर्व हट्टाचा पुरवठा करतात,या वृद्ध महिलांनी केलेले हट्ट म्हणजे कमिटीची जबाबदारी असे मानून हे हट्ट तात्काळ पुरवले जात आहेत.

बैतुल माल कमिटीत काम करणारे सदस्य एवढ्यावरच थांबलेले नाहीत तर त्यांच्या पत्नी आणि नातेवाईक सुद्धा स्वतःच्या आई प्रमाणे त्या वृद्ध महिलांच्या सुश्रुषेला नेहमी तयार असतात. आता बैतुलमाल कमिटीच्या माध्यमातून कोल्हापूरमध्ये ज्या मुलांनी आपल्या वृद्ध आई-वडिलांचे उपकार विसरून त्यांना आधार द्यायची वेळ आल्यानंतर आपले हात वर करून त्यांचा सांभाळ न करता बेदखल केले आहे अशांच्या आई-वडिलांना यतीमखान्यात आणून त्यांची सेवा करण्यासाठी व्यवस्था करायची आहे. त्याचबरोबर सर्व जातीधर्माच्या बांधवांना सेवाभावी दवाखाना उभारून मोफत रुग्णसेवा करायची आहे.यासाठी बैतुलमाल कमिटी आता जोरात कामाला लागली आहे. बैतुल माल कमिटीच्या या उपक्रमाला समाजातील दानशूर आणि दातृत्व असणाऱ्या व्यक्तींनी पुढे येऊन मदतीचा हात द्यावा हीच एक सामाजिक अपेक्षा आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : जाफरबाबा सय्यद ९९७५३३०३३०

◆◆◆















# मुस्लीम धर्मातील हे पंथ माहिती आहेत का?



मुस्लिम धर्मात नक्की किती पंथ आहेत आणि ते एकमेकांपासून कसे वेगवेगळे आहेत याविषयी जाणून घेण्यासाठी लोकांमध्ये उत्सुकता आहे.

एकाच धर्मामधल्या उपगटांमध्ये सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांनी दोन्ही पंथांबद्दल विशेषत: वहाबी पंथबाबत लोकांना जाणून घ्यायचं आहे.

इस्लाम समाजाचे सर्व अनुयायी स्वत:ला मुसलमान म्हणवतात. मात्र इस्लामचा कायदा (फ़िक़ह) आणि इतिहास याविषयीच्या आकलनानुसार मुसलमान विविध पंथांमध्ये विभागले गेले आहेत. प्रामुख्यानं मुसलमानांमध्ये शिया आणि सुन्नी असे दोन प्रमुख पंथ आहेत. मात्र या दोन्ही पंथांमध्येही असंख्य उपपंथ आहेत.

शिया आणि सुन्नी दोन स्वतंत्र गट असले तरी अल्ला एकच आहे, यावर त्यांचं एकमत आहे. मोहम्मद साहब अल्लाचे दूत असल्याचं हे दोन्ही पंथ मानतात.कुराण हा पवित्र ग्रंथ अल्लाची देणगी आहे यावर दोन्ही पंथांची श्रद्धा आहे.

मात्र धर्मपालनाच्या विविध पद्धती तसंच पैगंबर मोहम्मद यांच्या निर्वाणानंतर त्यांचा उत्तराधिकारी कोण यासंदर्भात दोन्ही पंथांमध्ये तीव्र मतभेद आहेत.दोन्ही पंथांचे कायदेकानूनही वेगळे आहेत.

## सुन्नी


जामा मशिद

पैगंबर मोहम्मद (इसवी सन ५७०-६३२) यांनी स्वत: अनुसरलेल्या गोष्टी तसंच विचारांचं पालन करणारा पंथ अशी सुन्नी अर्थात सुन्नत गटाची ओळख आहे.एका निष्कर्षानुसार जगभरातील मुसलमानांपैकी ८० ते ८५ टक्के सुन्नी पंथीय आहेत. तर उर्वरित १५ ते २० टक्के शिया पंथाचे आहेत.

सुन्नी पंथानुसार पैगंबर मोहम्मद यांच्यानंतर त्यांचे सासरे हजरत अबु बकर (६३२-६३४ इसवी सन) मुसलमानांचे प्रमुख झाले.

सुन्नी पंथ त्यांना खलिफा म्हणतो.अबु बकर यांच्यानंतर हजरत उमर (इसवी सन ६३४-६४४) हजरत उस्मान (इसवी सन ६४४-६५६) हजरत अली (इसवी सन ६५६-६६१) हे मुसलमानांचे अनुक्रमे नेते होऊन गेले. इस्लामच्या कायद्यानुसार सुन्नी पंथाचे चार उपगट आहेत. या चार गटांपासून स्वत:ला वेगळं राखणारा पाचवा गटही अस्तित्वात आहे.

या पाच गटांच्या धर्मपालन तसंच श्रद्धांमध्ये मोठा फरक नाही. मात्र प्रत्येक गटाच्या प्रमुखानं इस्लामची संकल्पना योग्य पद्धतीनं मांडली असल्याचा त्यांचा दावा आहे. आठव्या आणि नवव्या शतकात साधारण दीडशे वर्षांमध्ये चार प्रमुख धार्मिक नेते होऊन गेले. त्यांनी इस्लामच्या कायद्याची संकल्पना स्पष्ट केली. या नेत्यांना मानणारे त्या विशिष्ट प्रवाहाचे समर्थक झाले.

इमाम अबू हनीफा (इसवी सन ६९९-७६७), इमाम शाफई (इसवी सन ७६७-८२०), इमाम हंबल (इसवी सन ७८०-८५५) आणि इमाम मालिक (इसवी सन ७११-७९५) हे त्या काळातले चार प्रमुख नेते होते.

## हनफी



इमाम अबू हनीफा यांना मानणाऱ्यांना हनफी असं म्हटलं जातं. या विचारधारेचं देवबंदी आणि बरेलवी अशा गटांमध्ये विभाजन झालं आहे.

## देवबंदी आणि बरेलवी



देवबंदस्थित दारुल ऊलूम मदरसा उत्तर प्रदेशातील देवबंद आणि बरेली या जिल्ह्यांच्या नावावरून विचारप्रवाहांना नाव मिळालं आहे.


विसाव्या शतकाच्या सुरुवातीला मौलाना अशरफ अली थानवी (१८६३-१९४३) आणि अहमद रजा खाँ बरेलवी (१८५६-१९२१) यांनी इस्लामिक कायद्याची स्वतंत्र व्याख्या केली.

अशरफ अली थानवी देवबंदच्या दारुल-उलूम मदरशाशी संलग्न होते. तर आला हजरत अहमद रजा खाँ बरेलवी बरेलीचे होते. मौलाना अब्दुल रशीद गंगोही आणि मौलाना कासीम ननोतवी यांनी १८६६ मध्ये देवबंद मदरशाची स्थापना केली. देवबंद विचारप्रवाहाच्या प्रचारात मौलाना अब्दुल रशीद गंगोही, मौलाना कासिम ननोतवी आणि मौलाना अशरफ अली थानवी यांची भूमिका निर्णायक आहे.

भारत, पाकिस्तान, बांगलादेश तसंच अफगाणिस्तानात राहणारे बहुतांशी मुसलमान देवबंद आणि बरेली विचारप्रवाहांशी संबंधित आहेत. देवबंदी आणि बरेलवी या उपपंथांच्या समर्थकांच्या दाव्यानुसार कुराण आणि हादीस हे पवित्र धर्मग्रंथ शरियतचे मूलाधार आहेत. मात्र यासाठी इमामांच्या विचारांचं अनुकरण करणं आवश्यक आहे. त्यामुळे त्यांचे शरियतचे कायदे इमाम अबू हनीफा यांच्या विचारांनुसार आहेत. दुसरीकडे बरेलवी उपपंथाचे समर्थक आला हजरत रजा खान बरेलवी यांनी सांगितलेल्या विचारांना प्रमाण मानतात. बरेलीत आला हजरत रजा खान बरेलवी यांचा दर्गा आहे. त्यांना मानणाऱ्या समर्थकांसाठी हा दर्गा तीर्थ क्षेत्राप्रमाणे आहे.

देवबंद आणि बरेलवी या दोन विचारपंथांमध्ये मोठा फरक नाही. काही गोष्टींमध्ये मात्र मतभिन्नता आहे.बरेलवी विचारपंथानुसार मोहम्मद पैगंबर सर्वज्ञानी आहेत. विश्वातल्या सगळ्या सगुणनिर्गुण गोष्टींची त्यांना कल्पना आहे. ते सर्वव्यापी आहेत आणि विश्वाच्या पसाऱ्यावर त्यांची दृष्टी आहे.

## सुफी इस्लाम



नाही. देवबंद विचारपंथानुसार अल्लानंतर नबी महत्वाचे आहेत. पण, नबी हे मानव आहेत असे ते मानतात. बरेलवी सुफी इस्लामचे अनुयायी आहेत. त्यांच्याकडे सुफी मजार म्हणजेच संतांच्या समाध्यांना विशेष महत्त्व आहे.

देवबंदी विचारपंथामध्ये मात्र त्याला फारसं महत्व नाही, उलट ते याचा विरोध करतात.

## मालिकी



सुन्नी पंथीयांमध्ये इमाम अबू हनीफा यांच्यानंतर इमाम मालिक यांच्या विचारांना महत्व आहे.

आशिया खंडात त्यांना मानणाऱ्यांची संख्या कमी आहे. 'इमाम मोत्ता' हे त्यांनी लिहिलेलं पुस्तक प्रसिद्ध आहे. त्यांचे समर्थक मालिक यांनी विषद केलेल्या नियमांचं पालन करतात. मध्यपूर्व आशिया आणि उत्तर आफ्रिकेत मालिक यांचे समर्थक आहेत.

(पान १२ वर)












# जन्नत और दोज़ख क्या हैं ?

हाजी आयुब मुजावर
पन्हाळा

अल्लाहने यह सारा जहाँ, सारा नज़ारा और यह । सारी मखलुक भी बनाई हैं इस मखलुकमें सुरज, चाँद, सितारे, समंदर, पहाड, नदीयाँ, नहरे, पेड, पौधे शामिल हैं। आदमी, जानवर, पंछीयों के लिये ही बनाया इसे। सब इस मखलुक का मजा जमानेसे आज तक लुट रहें हैं। और आगे लुटते ही रहेंगे। खान पान का मज़ा चकते रहेंगे। आल्लाहने आदम अलैहि वसल्लमसे लेकर हमारे आका मुहंमद रसूले स्वल्लाहूअलैही सल्लम तक जितने भी पैगंबर, खलिफा भेजे, तबे ताबईन औलियाँ, अतकीयाँ बनाये उन सबसे अल्लाह बडा हैं, ला महादूद हैं। और उसने-आपने बताये हुये रास्तोंसे चलने का हुक्म दिया हैं। मगर उसकी इत्तिदायी कुछ लोग करते हैं। कुछ करते नहीं। यही इन्सानोकी फितरत हैं।

अल्लाह और उसके पैगंबरो का कहना मानने वालों को और न मानने वालों को भी अल्लाहने मौत दि हैं। अल्लाह का कहा और पैगंबरो का कहा न मानने वालोंको अल्लाह आजाबसे मारता हैं। जैसे नमरुद, कासन, फिरौन, अबूझैल, अबू लैल को मारा है वह सब जहन्नम (दोज़ख) में जाते है। अल्लाह और उसके पैगंबरो कां कहा मानने वाले उनके बताये हुये दिन के रास्तेपर चलने वालो को अल्लाहने जन्नत बक्षी हैं। भाईयों फीर यह जन्नत और दोज़ख क्या हैं आदमी मरने के बाद हम उसे कब्रमें दफनाते हैं। कब्र क्या हैं : कब्र आखिरत का पहला ठिकाना हैं। काफीर और मुनाफिकों के लिये आग (दोज़ख) हैं। गढ्ढे के रुप में, और मोमीन के लिये. कियारी (बगीचा) हैं। कई एक बुराई के कारण वहां आजाब होगा। जैसे पेशाबसे न बचना चुगली करना, गनीमत के माल में खयानात करना, झुट बोलना, नमाजके वक्त सोये रहना, कुरआन की तिलावत न करना, कुरआनके उसूलों को न मानना, पराई औरतोंसे सिना जोरी करना, मैथून करना, कर्ज वापस न करना, सूद लेना, लोगोंको गुमराह करना, एक दुसरे की खिल्ली उडाना, गिबत करना, बिद्दती करना आदी चिजे दोज़खी हैं। इससे जरुर जरुर बचना चाहीये नही तो आखिरत में दोजख नसिब होगी।

कब्रमें जानेके बाद यह चिजे हमें कब्रके आजाब से बचा सकती हैं। नेक और सच्चाईसे काम करना, हमेशा सच बोलना, यतीम, अंधे, लुले, लंगडे भिखारी गरिब लोगोंकी खिदमत करना, बेवाओंको राहत देना। सूद न लेना, दुसरों के मालपर घमंड न करना। अल्लातआला के लिये खलिस होना। कब्र आजाबसे बचने के लिये हमेशा नमाज पढना, कुरआन पढना, सदका देना, माँ बाप की और बडे बुजुर्गोंकी इज्जत करना / उनकी खिदमत करना। कब्रके आजाबसे बचने के लिये हमेशा सुरुतुल मुल्क की तिवत करना / आजाबसे बचने के लिये जिहादमे पहारा देनेवालों के लिये और जिहाद मे शहिद होनेवालों के लिये जुमाके रोज सुरुतुल मुल्क पढने वाले पेट और बाकी सब बिमारियोंसे मरनेवाले बुरे आजाब से बच जायेंगे वह जन्नती बन जायेंगे। हमेशा जन्नत मे रहेंगे। भाईयों सही है जन्नत के आसार जन्नत में जावो और हमेशा खुश रहो।

◆◆◆

हिंद एज्युकेशन सोसायटी कोल्हापूर संचलित

**मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू हायस्कूल और ज्युनिअर कॉलेज** सरनाईक वसाहत, जवाहर नगर कोल्हापूर.

कोल्हापूर शहर में माध्यमिक से उच्च माध्यमिक तक उर्दू और अंग्रेजी भाषा की बेहतरीन तालिम देनेवाली एकमात्र संस्था है।

लगातार १० वी और १२ वी कक्षा का निकाल १००%

बाबासाहेब इ मुल्ला – सेक्रेटरी
हाजी शौकत ता. मुजावर – उपाध्यक्ष
हाजी नुरमहंमद (बाळासाहेब) म्हं. सरखवास – अध्यक्ष
उस्मान ह. मुकादम – मुख्याध्यापक
कासिम इ. नदाफ – उपाध्यक्ष -शाळा समिती
मकतुम अ.देसाई – अध्यक्ष -शाळा समिती

आपके बच्चोंके उज्वल भविष्य के लिए हमारे स्कूल में आज ही दाखिला लिजीए।

संपर्क : 8329663987, 9921417896, 7507149786




सर्व हिंदू-मुस्लिम बांधवाना रमजान ईदच्या हार्दिक शुभेच्छा !

ATTAR SONS

झुआरी सिमेंट | बिर्लाशक्ती सिमेंट | चारमिनार पत्रा | बिर्ला ॲरकॉन रेडीमेड वॉल स्टार के पि.व्ही.सी. शिट | सोनालेक्स वॉटर टँक | सि बोर्ड | प्लेन शिट बिर्ला कलर कोटेड शिटस् | श्री ओम आणि जिंदाल TMT | वॉलनेट ए.ए.सी.ब्लॉक टाईल्स | ग्रानाईड | मार्बल | एम्.एस्. मटेरियल होलसेल दरामध्ये उपलब्ध.

65, Main Road, Balinga, Tal. Karveer, Dist. Kolhapur - 416 010 (M.S.) Pho. 0231-2631674, Fax : 0231-2631774

राजूभाई अत्तार - अच्छा दोस्त...! सच्चा दोस्त...!

सर्व हिंदू-मुस्लिम बांधवाना

रमजान ईदच्या

हार्दिक शुभेच्छा !



इम्तिहाजभाई बागवान
मा. चेअरमन बागवान नागरी पतसंस्था
संचालक हज फौंडेशन, कोल्हापूर.



नौमान बागवान
मो. 9130871926



नासिर बागवान

इम्तिहाजभाई सिकंदरभाई बागवान ॲन्ड ब्रदर्स

उमर फारुक (नौमान) इम्तिहाज बागवान

इमामभाई सिकंदरभाई बागवान ॲन्ड ब्रदर्स | हाजी बालेचांद सिकंदरभाई बागवान ॲन्ड ब्रदर्स

युनिट नं. २, गाळा नं. २०,३१ व ३२ श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर. मो. ९८९०८७१९२५, फोन. (०२३१) २६६३४३९

सर्व हिंदू-मुस्लिम बांधवाना रमजान ईदच्या हार्दिक शुभेच्छा !



मतिन वस्ता (भाईजान)
Mob : 9623323400

अंबा
डिलक्स लॉजिंग
Ac / Non AC Rooms

साईलीला
डिलक्स/फॅमिली रेस्टॉरंट
व्हेज | नॉनव्हेज | ब्रेकफास्ट

१५६८ सी, लक्ष्मीपूरी, छत्रपती फेटे शेजारी, कोल्हापूर. फोन : 0231-2643400

हा तर सुखाचा खजिनाच...


समृध्दीचा परिसस्पर्श व तुमच्या कल्पनेपेक्षाही अधिक सुविधा देणारी 150+ घरांची टाऊनशिप

अनंत प्राईड
www.anantestate.com

1,2,3 BHK & Penthouse are Available in READY POSSESSION

फेज २ मधील बांधकाम सुरु असलेल्या फ्लॅटस्चेही बुकींग चालू आहे.





फ्लॅटस्, परिसर व सुविधा पाहता क्षणी म्हणाल: व्वा ! केवळ अप्रतिम !!

9881534488 / 9881534477

A Prestigious Project By
अनंत इस्टेट डेव्हलपर ॲन्ड बिल्डर प्रा.लि.
25 Years of Excellence

साईट : ध्यानचंद हॉकी स्टेडियम जवळ, आयटीआय मागे, कोल्हापूर.

# मुस्लीम धर्मातील हे पंथ माहिती आहेत का?

### शाफई



(पान १० वरुन)

शाफई इमाम मालिक यांचे शिष्य आहेत आणि सुन्नींचे तिसरे प्रमुख नेते आहेत. मध्यपूर्व आशिया आणि आफ्रिकेत मोठ्या प्रमाणावर त्यांचे समर्थक आहेत.

श्रद्धेच्या बाबतीत ते अन्य पंथियांपासून वेगळे नाहीत. पण, इस्लामच्या अनुसरणाबाबतीत हनफी समुदायाच्या तुलनेत त्यांचा दृष्टिकोन वेगळा असतो.

### हंबली



सौदी अरेबिया, कतार, कुवैत आणि इतर आखाती देशांसह आफ्रिकेतील अनेक देशांमध्ये इमाम हंबल यांच्या विचारांना मानणारा मोठा वर्ग आहे.

ते स्वत:ला हंबली म्हणतात. सौदी अरेबियातील सरकारी शरियत अर्थात नियम हंबलच्या नियमांवर आधारित आहे. सल्फी, वहाबी आणि अहले हदीस सौदी अरेबियाच्या राजघराण्यातील सदस्य सुन्नी पंथात एक विचारप्रवाह असाही आहे की जो कोणत्याही विशिष्ट इमामाचं अनुकरण मानत नाही. शरियतचं पालन करण्यासाठी कुराण आणि हदीस यांचं अध्ययन करणं महत्वाचे आहे.

या समुदायाला सल्फी आणि अहले हदीस नावानं ओळखलं जातं. हा समुदाय चारही इमामांचे ज्ञान, अध्ययन, साहित्य यांचा आदर करतो. पण, यापैकी कोण्या एकाच इमामाचं अनुकरण करणे योग्य नाही. इमामांनी सांगितलेल्या ज्या गोष्टी कुराण आणि हदीसनुसार असतील त्यांचं पालन करावं. मात्र विवादास्पद प्रसंगी कुराण आणि हदीसचा शब्द अंतिम राहील. असं ते मानतात.

पैगंबरांच्या काळात इस्लामचं जे स्वरुप होते त्याचा प्रचार व्हावा असं सल्फी समुदायाचं मत आहे. इब्ने तैमिया (१२६३-१३२८) आणि मोहम्मद बिन अब्दुल वहाब (१७०३-१७९२) यांनी या विचाराला पुष्टी दिली. अब्दुल वहाब यांच्यामुळेच या समुदायाला वहाबी नाव मिळाले.

आखाती देशांमधील इस्लामिक विद्वान या समुदायानं मांडलेल्या संकल्पनांनी प्रभावित आहेत. या समुदायाचे वैशिष्ट्य म्हणजे धार्मिकदृष्ट्या ते अत्यंत कट्टर असतात आणि मूलतत्ववादाला पाठिंबा देतात. सौदी अरेबियाचं राजघराणं याच विचारांचं आहे. अल कायदाचा म्होरक्या ओसामा बिन लादेनही सल्फी विचारप्रवाहाचा समर्थक होता.

### सुन्नी बोहरा - मुस्लीम



भारतातील गुजरात, महाराष्ट्र आणि पाकिस्तानातील सिंध प्रांतात व्यापारउदीम क्षेत्रात जे मुसलमान कार्यरत आहेत यापैकी अनेकजण बोहरा मुस्लिम असतात.

बोहरा शिया आणि सुन्नी दोन्ही पंथांमध्ये असतात. सुन्नी बोहरा हनफी इस्लामिक कायद्याचं पालन करतात.

पण, सांस्कृतिकदृष्ट्या शिया पंथियांच्या चालीरीतींशी साधर्म्य असते.

### अहमदिया



बर्लिनमधील अहमदीया मशिद

हनफी इस्लामिक कायद्याचं पालन करणाऱ्या समुदायाला अहमदिया म्हटलं जातं. या समुदायाची स्थापना भारतातल्या पंजाबमधल्या कादियानमध्ये मिर्झा गुलाम अहमद यांनी केली होती. मिर्झा गुलाम अहमद, नबी यांचाच अवतार असल्याचं या समुदायाच्या अनुयायींचं म्हणणं आहे. मिर्झा यांनी नवा शरियतचा कायदा मांडला नाही. पैगंबरांनी सांगितलेल्या शरियतचंच हा समुदाय पालन करतो. पैगंबरांनंतर जगभरात अल्लानं दूत पाठवण्याची परंपरा बंद झाली यावर मुसलमानांच्या बहुतांशी संप्रदायांमध्ये एकमत आहे.


पण, अहमदिया समुदायाच्या म्हणण्यानुसार मिर्झा यांना नबीचा दर्जा प्राप्त आहे. या मुद्यावरून मुसलमानांमध्ये तीव्र मतभेद आहेत. मुसलमानांमधील एक मोठा वर्ग अहमदिया समुदायाला मुसलमान मानतच नाही. पण, तरीही भारत, पाकिस्तान आणि इंग्लंडमध्ये या समुदायाच्या अनुयायांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. पाकिस्तानात अधिकृतपणे अहमदिया समुदायाला इस्लाममधून वगळण्यात आलं आहे.

### शिया - मुस्लीम



सुन्नी पंथियांच्या तुलनेत शिया पंथाचे आचारविचार, धर्मविषयक विचार भिन्न असतात.पैगंबरांनंतर दूत पाठवण्याऐवजी इमामांची नियुक्ती केली जावी या विचारांचे ते समर्थक आहेत. (पान १४ वर)















# प्राथमिक अवस्थेतील कॅन्सर बरा होतो

## स्त्रियांनी सजगता बाळगावी

-डॉ. रेश्मा पवार
कॅन्सर तज्ञ
कोल्हापूर कॅन्सर सेंटर

कॅन्सर हा गंभीर आजार असून तो शरीराच्या कोणत्याही भागास होवू शकतो. त्याचे निदान लवकर झाले आणि तात्काळ उपचार केले तर अनेक प्रकारचे कॅन्सर बरे होतात. पण विलंब झाला तर जीवावर बेतते. कॅन्सरची भीती आपल्याकडे जास्त प्रमाणात आहे, अलीकडे याचे निदान व उपचार करून घेण्याच्या अत्याधुनिक सोयी उपलब्ध होत आहेत.

स्त्रिया तर कोणताही आजार गंभीर होईपर्यंत डॉक्टरकडे जातही नाहीत. म्हणूनच अनेक स्त्रिया कॅन्सरचे निदान होईपर्यंत मरणाच्या दारात आलेल्या असतात. कॅन्सर होणे म्हणजे ईश्वरी कोप झाला असे समजणारेही आहेत. रुग्णांना वाळीत टाकले जाते त्यामुळे या समाजात कॅन्सर या दुखण्याबद्दल कोणालाच माहिती मिळू शकत नाही. आणि वैद्यकीय मदतही मिळू शकत नाही.

### कॅन्सर म्हणजे काय?

सर्व सजीव प्राणी बारीक बारीक पेशींचे बनलेले असतात. या पेशी सतत नाश पावतात. आणि त्यांची जागा नव्या पेशी घेतात. ही नैसर्गिक क्रिया अबाधीत चालू असते. काही वेळा यातील काही पेशी डोके फिरल्यासारखे वाढतच राहतात.. त्यांच्या गाठी बनतात. यातील काही गाठी आपोआप जातात किंवा थोड्याफार उपचाराने नाहीशा होतात. पण काही गाठी वाढतच जातात.व त्यांचे रूपांतर कॅन्सर मध्ये होते. ही गोष्ट लक्षात आली तर या वाढणाऱ्या पेशींच्या गाठी शस्त्रक्रिया करून काढून टाकता येतात. आणि कॅन्सर बरा होतो. पण कॅन्सरच जर वाढतच गेला तर शस्त्रक्रिया अशक्य होते. त्याचबरोबर इतर उपचार करणे सुद्धा अशक्य बनते. कॅन्सर हा जंतुदोष किंवा संसर्ग नाही तो एकापासून दुसऱ्याला लागत नाही.

स्त्रियांमध्ये मुख्यत्वे स्तनांचा किंवा गर्भाशयाचा कॅन्सर आढळतो.त्यातही गर्भाशयाच्या तोंडाच्या (सर्व्हिक्सच्या) कॅन्सरचे प्रमाण अधिक असते. पण पुरुषांप्रमाणे स्त्रीला शरीराच्या कोणत्याही अवयवांचा कॅन्सर होवू शकतो.

### कॅन्सर होण्याची लक्षणे

कॅन्सरचे नेमके कारण अजून तरी माणसाला समजले नाही.पण खालील गोष्टी कॅन्सर होण्यास कारणीभूत होतात असे दिसून आले आहे.

- विडी सिगारेट ओढल्यामुळे फुफ्फुसाचा कॅन्सर होतो. हे निर्विवाद सिद्ध आहे. तंबाखू ओढल्याने, मिश्री वापरल्याने, तंबाखू खाल्याने इतर ठिकाणच्या कॅन्सरचीही शक्यता वाढते.
- हिपॅटायटिस बी सारख्या विषाणूंमुळे किंवा जननेंद्रियांवरील चामखीळीमुळे कॅन्सरचा धोका वाढतो.
- जेवणात खूप चरबी किंवा धोकादायक रसायने (पदार्थात घातलेले रंग किंवा ते टिकवण्यासाठी वापरलेली) यामुळे कॅन्सर होवू शकतो.
- संप्रेरक औषधे वेडीवाकडी वापरण्याने
- रासायनीक कारखान्यातून किंवा त्यांच्या धुरापासून कोणतेही संरक्षण उपाय न वापरता सतत काम केल्यामुळे उदा.जंतु नाशके, कीटकनाशके, रासायनिक रंग, किंवा इतर द्रावक.
- अणुशक्ती केंद्रावर किंवा जेथे किरणोत्सर्ग होत आहे.अशा वातावरणात सतत वावरल्याने स्रीयांच्या बाबतीत जवळच्या रक्ताच्या नातेवाईकांत असलेले काहीही प्रकारचे कॅन्सर अनुवांशिकतेमुळे होण्याची शक्यता जास्त असते.

आरोग्यास पोषक असे जीवन कॅन्सर प्रतिबंधक असे असते. याचा अर्थ असा की, चौरस आहार घ्यावा आणि ज्याच्यामुळे कॅन्सर होऊ शकतो त्या गोष्टीचा संसर्ग टाळावा.

- तंबाखू खाऊ नका, मिश्री लावू नका व विडी सिगारेट ओढू नका. अपाय होऊ शकतो.
- कॅन्सरजनिक रासायनिकांचा वापर अन्नातून, शेतीमध्ये वापरलेले फवारे व धान्य टिकवण्यासाठी वापरलेली औषधे तसेच कामधंद्याच्या ठिकाणी येणार नाही याची खबरदारी घ्या.
- लैंगिक संबंधातून होणाऱ्या रोगापासून आपले संरक्षण करा. विशेषतः लैंगिक अवयवांवरील चामखिळ व एच.आय.व्ही. कसा टाळता येईल, त्याबद्दलची काळजी घ्या.

### स्तनाच्या समस्या

**स्तनातील गाठी :** मुलगी मोठी होऊ लागली की तीचे स्तन वाढू लागतात. शरीरात तयार होणाऱ्या संप्रेरकाचा त्याच्यावर परिणाम होतो. काहीवेळा पाळी जवळ आली म्हणजे ते भरल्यासारखे होतात. दुखरे होतात व पाळी सुरू झाली की पुर्ववत होतात. हे चक्र पाळी सुरू असेपर्यंत (वयाच्या ४५ ते ५० पर्यंत) चालू असते. काही वेळा स्तनात गाठ होऊ शकते. ही गाठ कोणत्याही वयात होऊ शकते. बहुतेक वेळा ही कॅन्सरची नसते. तरीसुद्धा ती मोठी होत जाते. त्याआधीच ती काढली पाहिजे व तिची कॅन्सरसाठी तपासणी करून घेतली पाहिजे.

**स्तनांच्या बोंडीतून (स्तनाग्रातून) स्त्राव :**

दुधाळ पाण्यासारखा स्त्राव गर्भार बायकांच्या दोन्ही स्तनांतून येणे व अंगावर पाजणाऱ्या बायकांच्या स्तनातून येणे, नैसर्गिक असते. पण हिरवट, तांबडट किंवा विटकरी स्त्राव, विशेषतः एकाच स्तनातून येणे, कॅन्सरची सुचना असू शकते. त्याची ताबडतोब तपासणी करून घेतली पाहिजे.

स्तनपान देत असताना जर स्तनावर लाल दुखरी जागा किंवा गाठ असेल तर ते गळू असेल व औषधाने बरे होते.

**स्तनाचा कॅन्सर :** स्तनाचा कॅन्सर आपल्याकडे मोठ्या प्रमाणात आढळतो व तो जितक्या लवकर लक्षात येईल व त्यावर इलाज होईल तितका तो संपूर्ण बरा होतो. म्हणून ज्यांच्या घरात आई, बहिण, मावशी वगैरे जवळच्या नातेवाईकांत कुणालाही कॅन्सर झाल्याचा इतिहास असेल तर त्या घरातील सर्व मुलींनी त्या कॅन्सरबद्दल दक्ष असले पाहिजे. शक्यतो जाणतेपणी तपासणी करून घेतली पाहिजे.

### धोक्याच्या सुचना :

- कडक, जराशी वेडीवाकडी, एका स्तनात असलेली चामडी, खाली न हलणारी गाठ.
- एका स्तनावर लाली किंवा न बरा होणारा व्रण.
- एक स्तनाची चामडी खरखरीत-संत्र्याच्या सालीसारखी मध्येच खोल गेलेली दिसली तरी, स्तनाला किंवा बोंडीला खळगा पडला तर.
- स्तनांची बोंडी आत खेचली जाणे.
- काही वेळेला एकाच बाजूच्या काखेत सूज. क्वचित स्तनात वेदना

यापैकी कोणतेही लक्षण दिसले तर ताबडतोब वैद्यकीय सल्ला घ्यावा.

### स्तनाच्या कॅन्सरचे निदान व उपचार :

तुम्ही जर नियमितपणे आपल्या स्तनांची तपासणी करत असाल तर स्तनात झालेली लहानशी गाठही तुमच्या स्पर्शातून सुटणार नाही. अगदी लहानशी गाठ असली तरी मॅमोग्रॅम या एक्स-रे परिक्षेत कॅन्सरचे निदान होऊ शकते. पण सर्वच ठिकाणी ही परिक्षा उपलब्ध नसते.

स्तनाचा कॅन्सर का होतो व त्यावर प्रतिबंधात्मतक उपाय कोणते याबद्दल अजून फारशी माहिती उपलब्ध नाही. अनेक स्त्रियांत एकदा शस्त्रक्रिया केल्यानंतर तो पुन्हा उद्भवत नाही. पण काही वेळा अनेक वर्षांनी उद्भवतो.

### कॅन्सर असाध्य केव्हा होतो?

कॅन्सरचे निदान लवकर झाले तर अनेक ठिकाणचे कॅन्सर रोग बरे होतात. पण काही वेळा काहीही इलाज करता येत नाही. हॉस्पिटलमध्येही त्यावर उपचार होऊ शकत नाही. त्यावेळी आपल्या माणसांत, आपल्या घरी राहणे सर्वात योग्य होय. अर्थात ही परिस्थिती रोग्याला व त्याच्या घरादाराला बिकटच असते. तरीपण रोग्याला दिलासा देणे, त्याला जे जाईल ते व आवडेल ते खाऊ घालणे, त्याचे मन दुखण्यापासून परावृत्त करणे वगैरे गोष्टी घरची मंडळी करू शकतात. वेदनानाशकांचा व झोपेच्या औषधांचा योग्य उपयोग करावा. आयुष्यातील काही गोष्टींची निरवानिरव करायची असल्यास ती मदत करावी व रोग्याची व त्याच्या जवळपासच्या माणसाची त्याच्या मृत्यूबद्दल मानसिक तयारी करावी.

### बदलासाठी कार्य :

अनेक प्रकारच्या कॅन्सरचे जर लवकर निदान झाले तर पुष्कळ वेदना व मृत्यूही टाळता येतील. त्यासाठी कॅन्सरचे लवकरात लवकर निदान होण्याची सोय झाली पाहिजे.

- ग्रामीण भागात व लहान आरोग्य केंद्रात कॅन्सर तपासणीची सोय होणे जरूरी आहे.
- ग्रामीण व नागरी आरोग्यरक्षकांनी सर्व्हिक्सचा कॅन्सर पाहून ओळखण्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे व पॅप टेस्टसाठी स्लाईड तयार करण्यास शिकविले पाहिजे.
- पॅप टेस्ट करण्यासाठी जास्त लॅबोरेटरीज उघडणे जरूरी आहे. कॅन्सरबद्दल विशेषतः प्रतिबंधक उपाय सुरूवातीची लक्षणे ओळखण्याची क्षमता याबद्दल सर्व समाजाचे सतत शिक्षण होण्याची जरूरी आहे.
- कॅन्सर झालेल्या स्त्रियांसाठी कमी दरात उपाय योजना झाली पाहिजे.

### स्त्रियांनी खालील गोष्टींची दखल घ्यावी :

- स्तनांची स्वतः तपासणी करण्यास शिकावे.
- स्तनांच्या, सर्व्हिक्सच्या व गर्भाशयाच्या कॅन्सरच्या पुर्वसुचना किंवा सुरूवातीची लक्षणे याच्याकडे दुर्लक्ष करु नये. कॅन्सर टाळण्याचे सर्वात महत्वाचे साधन म्हणजे समाजाचे आरोग्य शिक्षण होय. कॅन्सर कशाने होण्याची शक्यता आहे. व्यसनापासून कसे दूर रहावे. स्वतःला व जोडीदाराला गुप्तरोगापासून कसे संरक्षण द्यावे, या गोष्टी कॅन्सरला कशा प्रतिबंध घालू शकतात. याबद्दल तज्ञ व्यक्तींनी समाजाचे प्रबोधन केल्यास कॅन्सरचा प्रादुर्भाव कमी होईल. ◆◆◆



# मुस्लीम धर्मातील हे पंथ माहिती आहेत का?

(पान १२ वरुन) पैगंबरांच्या निधनानंतर त्यांचे जावई हजरत अली यांना शियापंथीय उत्तराधिकारी म्हणून मानतात. शियांच्या म्हणण्यानुसार पैगंबरांनीही अली यांनाच उत्तरा-धिकारी म्हणून जाहीर केलं होतं. पण, हजरत अबू बकर यांनी फसवून प्रमुखपदी वर्णी लावून घेतली. शियापंथीय मुसलमान पैगंबरांनंतरच्या तीन खलीफांना नेता मानत नाहीत.ते त्यांना गासिब असं म्हणतात. गासिब अरबी शब्द आहे. हडपणे असा त्याचा अर्थ होतो. शियापंथीयांनुसार अल्लानं मोहम्मद यांना पैगंबर म्हणून पाठवलं होतं. त्याच धर्तीवर मोहम्मद यांचे जावई अली यांना अल्लानेच इमाम/नबी म्हणून पाठवलं होतं. त्यांची मुलं पुढचे इमाम होत गेले. पुढे जाऊन शिया पंथातही अनेक गट पडले.

### इस्ना अशरी


इराकमधील मुस्लीम समुदाय

शिया पंथातला इस्ना अशरी हा सगळ्यात मोठा समुदाय आहे. जगभरातल्या शिया पंथियांपैकी ७५ टक्के लोक याच समुदायाचा भाग आहेत.त्यांचे पहिले इमाम हजरत अली आहेत तर शेवटचे आणि बारावे इमाम महदी आहेत. इस्ना अशरी समुदायाचे समर्थक अल्ला, कुराण आणि हदीस यांचे पालन करतात.पण, त्यांच्या इमामांच्या माध्यमातून आलेल्या हदीसचं हा समुदाय पालन करतो.कुराणानंतर 'नहजुल बलागा' आणि 'अलकाफी' हे दोन धर्मग्रंथ या समुदायासाठी महत्वपूर्ण आहेत.इस्ना अशरी समुदाय जाफरियावर विश्वास ठेवतात. इराण, इराक, भारतासह पाकिस्तान तसंच जगभरात या समुदायाचे पाइक आहेत.

### जैदिया



या समुदायाचे लोक बारा ऐवजी केवळ पाच इमामांच्या पद्धतीवर विश्वास ठेवतात. यापैकी चार इमाम इस्ना अशरी समुदायाचेच आहेत. पाचवे इमाम म्हणून हजरत अली यांचे नातू जैद बिन अली यांना मानतात. म्हणून ते स्वत:ला जैदिया म्हणतात. जैद बिन अली यांच्या 'मजमऊल फिकह' नुसार या समुदायाचे कायदेकानून आहेत. आखातातील यमनमध्ये जैदिया समुदायाचे समर्थक आहेत.

### इस्माइली शिया



या समुदायानुसार इमामांची संख्या सातच आहे. शेवटचे इमाम मोहम्मद बिन इस्माइल आहेत. यामुळेच समुदायाचे नाव इस्माइली असं आहे.इमाम जाफर सादिक यांच्यानंतर त्यांचा मोठा मुलगा इस्माईल बिन जाफर प्रमुख होणार की त्यांचा धाकटा मुलगा प्रमुख होणार. यावरून त्यांचे इस्ना अशरी समुदायाशी वाद झाले.इस्ना अशरी समुदायानं धाकटा मुलगा मूसा काजिम यांना इमाम मानले. तेव्हापासून दोन गट निर्माण झाले.इस्माइली समुदायानं इस्माइल बिन जाफर यांना सातवे इमाम मानले. या समुदायाचे आचारविचार इस्ना अशरी समुदायापासून वेगळे आहेत.

### दाऊदी बोहरा


दाऊदी बोहरा मुसलमान

बोहरा समुदायाचाच हा एक छोटा भाग आहे. हा समुदाय इस्माइली शिया गटाच्या आचारविचारांचं पालन करतो. दाउदी बोहरा २१ इमाम असल्याचं मानतात. तैयब अबुल कासिम त्यांचे शेवटचे इमाम होते. त्यानंतर आध्यात्मिक गुरुंची परंपरा या समुदायात आहे. त्यांना दाई म्हटलं जातं. सैय्यदना बुऱ्हानुद्दीन रब्बानी ५२ वे दाई होते. २०१४ मध्ये त्यांचं निधन झालं.त्यानंतर त्यांच्या दोन मुलांमध्ये उत्तराधिकारी होण्यावरून वाद झाला.हा वाद न्यायालयात गेला.

दाऊदी बोहरा समुदाय गुजरात आणि महाराष्ट्रात आहे. पाकिस्तान आणि येमनमध्येही या समुदायाचे समर्थक आहेत. यशस्वी व्यापारी समाज म्हणून दाऊदी बोहरा सुपरिचित आहेत.


### खोजा


खोजा मुसलमान

गुजरातमधला हा व्यापारी समुदाय आहे. ज्यांनी काही दशकांपूर्वीच इस्लामचा स्वीकार केला आहे. खोजा समुदायाचे समर्थक शिया आणि सुन्नी दोन्ही पंथांच्या विचारांना मानतात. खोजा समुदायातले अनेकजण इस्माइली शियांच्या धार्मिक नियमांचं पालन करतात.

पण, त्याचवेळी याच समुदायातले बहुतांश जण इस्ना अशरी पंथाप्रमाणे आचरण करतात.काही मोजके लोक सुन्नी इस्लामला मानतात. पूर्व आफ्रिकेतील काही देशांत खोजा समुदायाचे लोक राहतात.

### नुसैरी



सीरियाचे राष्ट्राध्यक्ष बशर अल असद हे नुसैरी पंथाचं पालन करतात हा समुदाय सीरिया आणि इतर आखाती देशांमध्ये आढळतो. अलावी नावानंही हा समुदाय ओळखला जातो. सीरियाचे राष्ट्राध्यक्ष बशर अल असद हे नुसैरी समुदायाशी संलग्न आहेत.

या समुदायानुसार अली देवाचा अवतार म्हणून भूतलावर अवतरले.इस्ना अशरी समुदायाप्रमाणे ते आचारविचारांचं पालन करतात. मात्र त्यांच्यात काही मतभिन्नता आहेत. या व्यतिरिक्त इस्लाममध्ये अजूनही काही छोटे-छोटे उपपंथ आहेत.

◆◆◆

# खरचं भारत धर्मनिरपेक्ष आहे काय?

(पान ५ वरुन) विषारी बिजाची पेरणी करतात. हेच लोक सर्वाधिक धर्मान्ध असतात. त्याचं धर्म, सत्ता, पैसा ताकद हेच असते. त्यांच्या या खेळीला उत्तर देण्याची ताकद तुमच्या आमच्यात आहे. फक्त त्यासाठी धर्मनिरपेक्षतेचा वरवरचा बुरखा फाडून टाका . स्वधर्माचा अभिमान ठेवा, म्हणजे धर्मनिरपेक्षताचा फुकटच्या खोटेपणाचे बुरखे आपोआप गळून पडतील...

हा माझा सण नाही हा तुझा सण असे करुन नाकतोंड वाकडे केले जाते. यातून मोठया प्रमाणात विषमता पसरते. प्रत्येक जण आपल्या धर्माचा अवास्तव अभिमान बाळगतो. त्यातून मानवी मनातील गाभाऱ्याला धोका पोहचतो. ऐतिहासिक दाखले देऊन आपलाच धर्म कसा श्रेष्ठ हे समजावून सांगण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. यातून आपण सर्व भारतीय एक आहोत ही भावना मागे पडून मानवतेची भावना नाहीशी होत आहे. सद्याच्या काळात सोशल मीडियावर धार्मिक भावना भडकवण्याचे प्रयत्न केले जातात.

पण काही असू द्या, माणूस कोणत्याही धर्मात जन्माला येवू दे. पण खरे सुख भारतीय म्हणून मरण्यात आहे हे जेव्हा कळेल तेव्हाच या देशात खरी धर्मनिरपेक्षता आहे असे म्हटले पाहिजे. आठवा ते सीमेवरील जवान कोणत्या धर्मासाठी गोळी छातीवर घेऊन लढतात. भारतमातेच्या सेवेसाठी त्यांना कोणतीही जात नसते ना, धर्मही नसतो ही खरी धर्मनिरपेक्षता...

भारत धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे असे ओरडून सांगून काय फायदा. आजच्या काळातही अनेक धर्मकंटक सांगतात की, 'इस्लाम खतरे में है' 'भारत हिंदुराष्ट्र झालेच पाहिजे' ह्या घोषणा म्हणजे आधुनिक काळात राष्ट्रनिर्मितीचा गळा घोटण्याचा प्रकार आहे. बहुसांस्कृतिकता ही भारताला मिळालेली अनमोल देणगी आहे. त्याला एका संस्कृतीत गुंफने शक्य नाही. तरीही असे प्रयत्न होत आहेत आणि लोकशाही मुल्ल्यावर घाला घालत आहेत. म्हणून धर्म नव्हे तर धर्मनिरपेक्षता धोक्यात येत आहे. त्याच्या विरोधात धर्मनिरपेक्षवाद्यांनी आवाज उठवण्याची गरज आहे.

– नाना गोडगे

सर्व हिंदू-मुस्लिम बांधवाना रमजान ईदच्या हार्दिक शुभेच्छा !
रिजवान मुजावर
कोल्हापूर चिकन सेंटर

लेग पिस व लॉली पॉप स्पेशालिस्ट
आमचेकडे बॉयलर चिकन, तंदुरी व होलसेल दरात अंडी मिळतील.
२६६, ई वॉर्ड, न्यू शाहुपूरी, कोल्हापूर-४१६००१.
फोन नं. ०२३१-२६६२४८०, मोबा. ९८६०६०५०४०

सर्व हिंदू-मुस्लिम बांधवाना रमजान ईदच्या हार्दिक शुभेच्छा !
सामाजिक कार्यकर्ते

इसाक पाथरवट
Mob : 9822786600
सामाजिक कार्यकर्ते

फिरोज आटपाडे
Mob : 8483901062

सर्व हिंदू-मुस्लिम बांधवाना रमजान ईदच्या हार्दिक शुभेच्छा !

श्री. प्रकाश आनंदराव गवंडी
नगरसेवक, कोल्हापूर महानगरपालिका
प्रभाग क्र. २२, पंचगंगा तालीम
संपर्क कार्यालय : 'शिवानंद अपार्टमेंट' २११०, डी वॉर्ड, शुक्रवार पेठ,
पंचगंगा हॉस्पीटल समोर, कोल्हापूर. फोन : ०२३१-२५४४५८३, मो.: ९४२३०४०६३६

सर्व हिंदू-मुस्लिम बांधवाना रमजान ईदच्या हार्दिक शुभेच्छा !
साजीदभाई : 9422796793
इर्शादभाई : 9860944933 / 9545688786
साद जैद कॅटरर्स
लग्न समारंभ, शुभ कार्य व पार्टीच्या ऑर्डर स्विकारल्या जातील.
- मटण व चिकन बिर्याणी
- मटण व चिकन पुलाव दालचा
- तंदुर पदार्थ, फ्राय पदार्थ
- स्पे. हैद्राबादी चिकन व मटण दम बिर्याणी
- मांसाहारी ताट सिस्टीम
- गोड पदार्थ इ. मिळतील.
१ किलो पासून १० किलो पर्यंत ऑर्डरप्रमाणे बिर्याणी व पुलाव हॉटेलमध्ये करून मिळेल.

हाजी इर्शाद बंडवल
9545688786, 9860944933
साजीद बंडवल
9422796793
HOTEL Saad
Veg, Nonveg & Kabab Corner
- स्पेशल कोल्हापूरी मांसाहारी थाळी
- तंदूर रान, दम पक मुर्गी
- स्पेशल हैद्राबादी दम बिर्याणी
- डीश व थाळी सिस्टीम
- फॅमिलीची स्वतंथ सोय

Prop. Mr. Imran Sallaudin Bagwan
Mob : 9890470786

Since 2007

# House of Envelope

Manufacturing & Wholesaler

- Cloth line, Official.
- Courier, X-ray, Medical.
- Wedding Card size in Plan & Window Envelop Paper Bags.
- Printed & Non-Printed
- Computer Stationery.

Radhika Road, Vimal Regency, Near Andra Bank, Satara, Ph. 87961 70786, 99219 48558





Since 2007


Prop. Mr. Imran Sallaudin Bagwan / M. 9890470786

# Hindustan Business Forms

Manufacture of Pre-Printed Computer Stationery

LIC of India : Maharashtra, Karnatak, Gujarat, Kerala, Hyderabad, Goa, Delhi, Bihar State.
Bank, Patsanstha, Goverment Office, Suger Factory, Medical Farmacticul Distributer,
Tax Invoice Printed Non Printed Computer Stationery

- OFF. : 'S.K. Tower', 528, Shaniwar Peth, Satara-415 002. (Mah.) ■ Ph. (02162) 234488, 231786
- FACT. : Plot No. 786, Malwadi Road, Saidapur, Satara-415 002. (Mah.) ■ Ph. (02162) 253400/252401
- E-mail : hindustanbusinessforms@yahoo.co.in




Prop. Mr. Imran Sallaudin Bagwan / M. 9890470786

Since 1992

# SK Packing Center

**Our Customers**

Manufacturing of All Types of Envelope & Offset Printing

**LIC of India :** Maharashtra, Karnatak, Gujarat, Kerala, Hyderabad, Goa, Delhi, Bihar State.
**Times of India Press :** Mumbai, Pune, Goa, Belgam, Hubli, Dharwad, Mysore, Bagalkot, Banglore, Ahmedabad.
**SSC Board :** Kolhapur, Pune, Nashik, Ratnagri, Mumbai.
**Bank's :** Bank of Maharashtra, Reg. Office Kolhapur, DCC Bank Satara, Sangli, Kolhapur, Pune, Shikshak Co.op Bank Satara, Rayat Co.op Bank Ltd., Satara.

"S.K. Tower", 528. Shaniwar Peth, Satara - 415 002.
Email : skpackingstr786@yahoo.in | Web : www.indiamart.com/hindustanbusinessforms
Ph. : (02162) 234488 / 231786 | Fax : (02162) 239536





S.K. Bagwan : 98900 70786. 98500 70786

हिंदुस्थान पेपर मिल

Imran Bagwan : 98904 70786

Since 2013

# Hindustan Paper Mill


**Manufacturing of**

All Types of Craft Paper Natural Shade &
Golden Yellow with High B.F.12 to 28, upto 100 to 400 gsm

OFF.: S.K.Tower, 528, Shaniwar Peth, Satara - 415 002. (Mah.)
Ph : 02162-234488, 231786, Fax : 02162-239536

Fact.: Gat No. 72/1/1/1, At-Channehatti, Village Rajgoli, Tal. Chandgad,
Yalkamaddi-Daddi-Rajgoli Road, Kolhapur. E-mail : hindustanpapermill@gmail.com




'दिनमान' हे पत्र मुद्रक श्री. प्रदिप शंकरराव पडवळे, यांनी प्रकाशक व मालक श्री. समीर आयुब मुजावर यांचे करिता मुरारी मुद्रणालय, २१०० / क, १५२ / १७, महाडिक कॉलनी कोल्हापूर (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून ८६७, ई वॉर्ड, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेजच्यामागे, कसबा बावडा, कोल्हापूर-४१६ ००६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. (या साप्ताहिकात प्रसिद्ध झालेल्या मजकूराशी संपादक सहमत असतीलच असे नाही) संपादक- समीर आयुब मुजावर.